# देशी बियाणांची बँक प्रत्येक गावात तयार करा

## पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपेरे यांचे आवाहन : औषधी रानभाज्यांचे सेवन करा

प्रतिनिधी

कोल्हापूर

संकरित बियाणांमुळे मानसाचे आरोग्य बिघडत असून, जीवनमानसुध्दा कमी होत चालले आहे. मी शिक्षण घेतले नसले तरी ही बाब माझ्या लक्षात आली अन मी देशी बियाणांची लागवड करण्यास सुरुवात केली. गावातील महिलांनाही देशी वाणांची रोपे दिली. परिणामी माझ्या कुटुंबासह गावाचे आरोग्य चांगले झाले. त्यामुळे आरोग्यदायी जीवनासाठी प्रत्येक गावात देशी वाणांची बँक तयार करा, असे आवाहन पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपेरे यांनी केले.




कोल्हापूर : ताराराणी विद्यापीठाच्या वतीने पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपेरे यांना भद्रकाली ताराराणी पुरस्कार प्रदान करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत अशोक पर्वते, डॉ. एस. एन. पवार, डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील.

ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त यंदाचा 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार' अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील पोपेरेवाडीतील पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपेरे यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पार पडला. रोख ५१ हजार रूपये, शाल, श्रीफल, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

पोपेरे म्हणाल्या, सध्याचे शेतकरी जादाचे पिक मिळवण्याच्या नादात विषयुक्त फळ, भाज्या पिकवत आहेत. परिणामी मानवांना अनेक आजारांचा सामना करावा लागत आहे. औषधांमुळे मातीची गुणवत्ताही कमी होत आहे. जुन ते सोन या म्हणीप्रमाणे देशी बियाण मानवासाठी आरोग्यदायी असतात. शेतकऱ्यांसह जनतेने आपल्या शेतात, परसबागेत, टेरेस गार्डन, किचन गार्डनमध्ये देशी वाणांच्या भाज्यांची लागवड करावी. जेणेकरून प्रत्येक गावात एक राहीबाई तयार होईल. याचा फायदा आपल्या पुढच्या पिढीला होईलच, पण त्यांचे आरोग्य चांगले राहून जीवनमानाचा कालावधी वाढेल. शेतातील औषधी रानभाज्यांचे सेवन केले पाहिजे, असा संदेशही पोपेरे यांनी दिला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राहीबाई पोपेरे या देशाच्या नव्हे तर जगाच्या रोल मॉडेल आहेत. त्यांच्या देशी बियाणांचा प्रचार आणि प्रसार देश-विदेशात होत आहे. त्यांनी लोकांनी जेवढया बिया दिल्या त्या बदल्यात दुप्पट बिया त्यांच्याकडून परत घेतल्या. त्यांची देशी बियाणांची बँक समाजासमोर एक आदर्श आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचा समावेश पाठ्यपुस्तकांच्या अभ्यासक्रमात केला पाहिजे.

प्रास्ताविक ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. सूत्रसंचालन पौर्णिमा मंडलिक यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. सुजय पाटील यांनी करून दिला. गौरवपत्राचे वाचन सोनल चव्हाण यांनी केले. यावेळी सचिव प्राजक्त पाटील, अशोक पर्वते, उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार, डॉ. डी. आर. मोरे, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. अनिल घस्ते आदी उपस्थित होते.

Scanned by CamScanner